993



# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** सातारा **P.S.(ठाणे):** फलटण शहर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0004 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 07/01/2025 01:41

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार **Date From (दिनांक पासून):** 06/01/2025

**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 06/01/2025

**Time From (वेळेपासून):** 17:09 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 17:09 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 07/01/2025 **Time (वेळ):** 00:30 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 006

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 07/01/2025 01:41 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** तलाठी व मंडलाधिकारी कार्यालय,फलटण

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** संतोष प्रभाकर जिंतुरकर
(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1982
(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | सगुणामाता नगर, मलठण,फलटण,फलटण शहर,सातारा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | वागदरी,ता अक्कलकोट,सोलापुर,सोलापुर शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**
(j) **Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):** 91-8275305281

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | दिपक दौलतराव उदंडे | | | 1. 123, कसबा पेठ, फलटण, फलटण,फलटण शहर,सातारा, महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

खबरी जबाब- दिनांक 07/01/2025

मी संतोष प्रभाकर जिंतुरकर, वय 43 वर्षे, व्यवसाय - वरिष्ठ तंत्रज्ञ, (मौजे वागदरी,ता. अक्कलकोट, जि.सोलापुर) रा. सगुणामाता नगर, मलठण, ता.फलटण जि.सातारा मो.नं. - 8275305281

मी दि. 06/01/2025 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो, सातारा येथील पो.नि.भोसले यांचेशी मोबाईल फोनवर संपर्क साधुन माझ्याकडे होणाऱ्या लाचेच्या मागणीबाबत थोडक्यात तक्रार सांगीतली व माझ्या तक्रारी नुसार कारवाई करावी अशी विनंती केली.

त्या नियोजनानुसार दि. 06/01/2025 रोजी पो.नि.भोसले यांनी मला संपर्क केल्यावरुन मी फलटण विमानतळ येथे 12.00 वा.चे सुमारास आलो असता त्या ठिकाणी पोलीस निरीक्षक श्री भोसले हे दोन शासकीय पंच, सापळा पथक यांचेसह माझ्या जवळ येवुन थांबले. त्यावेळी त्यांनी माझी ओळख करुन घेऊन दोन पंचाची व सापळा पथकाची आम्हाला एकमेंकाना ओळख करुन दिली. तेव्हा मी माझी तोंडी तक्रार थोडक्यात सांगितली. मी माझी पत्नी सौ. आश्विनी संतोष जिंतुरकर हिचे नावे सगुणामाता नगर मलठण, फलटण येथे माझे मेहुणे अभिलाष मेणसे यांचेकडुन मौजे फलटण येथील सर्वे नंबर 101/पै/गावठाण/प्लॉट/नं/312 मधील 1.39 आर मधील प्लॉट त्यावरील निवासी घरासह दिनांक 07/11/2024 रोजी खरेदी केले आहे.खरेदी केलेल्या घराची सातबाऱ्यावर नोंद होणेकामी मी खरेदी दस्त व पत्नीच्या नावचा अर्ज दिनांक 09/11/2024 रोजी तलाठी कार्यालय फलटण येथे देण्यासाठी गेलो होतो. तेव्हा तेथे तलाठी नव्हते म्हणुन सर्व कागदपत्रे मी कोतवाल उदंडे यांचेकडे दिली होती. त्यावेळी त्यांनी मला मी तुमच्या नोंदीचे काम करुन देतो मला एक हजार रुपये द्या असे सांगीतले. त्यावेळी मी त्यांना तुम्ही काम करा मी ड्युटी साठी सोलापुर येथे जायचे आहे असे सांगुन निघुन गेलो.

त्यानंतर मी माझ्या कामावर वागदरी, सोलापुर येथे असल्याने कामाबाबत चौकशी करण्यासाठी दिनांक 30/12/2024 रोजी माझा मेहुणा अखिलेश मेणसे यांना तलाठी कार्यालय फलटण येथे पाठविले असता कोतवाल उदंडे यांनी माझ्या मेहुण्याकडुन माझ्या पत्नीस फोन करायला लावला. तेव्हा माझा मेहुणा याने त्याचा मो.नं. 7385393495 वरुन माझ्या पत्नीच्या मो नं 8788909916यावर फोन करुन कोतवाल उदंडे यांना बोलायला दिले त्यावेळी कोतवाल उदंडे यांनी माझ्या पत्नीस सांगीतले की, तुमच्या घराची नोंद 24/12/2024 रोजी झाली आहे. मी तुमच्या पतीकडे फी सांगीतली होती ती अजुन दिली नाही असे सांगीतले. त्यावर माझ्या पत्नीने मला फोन करुन कोतवाल उदंडे हे कामाची फी मागत असलेबाबत सांगीतले.

घराच्या खरेदी पत्राची सातबाऱ्यावर नोंद घेण्यासाठी कोणतीही फी लागत नाही तसेच नोंद घेण्याचे काम हे तलाठी करतात हे मला माहीत आहे. कोतवाल उदंडे हे माझ्याकडे झालेल्या कामाचा मोबदला म्हणुन फी द्या, असे म्हणुन मागणी करत असलेली रक्कम ही लाच असल्याची माझी खात्री झाली आहे. त्यामुळे त्यांच्यावर आपले विभागामार्फत योग्य ती कायदेशीर कारवाई करावी. वैगेरे मजकूरचा तक्रार अर्ज मी हजर केला. तो अर्ज पंचास दाखवला सदर अर्जाचे अवलोकन करून त्यावर पोनि भोसले व दोन्ही पंचांनी सह्या केल्या.

त्यानंतर पो.नि.भोसले यांनी मला पंचासमक्ष तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणी कारवाईची माहिती दिली व प्रक्रिया समजावून सांगितली. त्यानंतर लागलीच पो.नि. भोसले यांनी पडताळणी कारवाईचे नियोजन केले. त्यानंतर पो.नि. भोसले यांनी पंचासमक्ष मला पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने आवश्यक त्या सुचना दिल्या व व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन त्यामध्ये माझे व पंच नंबर 1 डंगारे व पंच नंबर 2 मेंडके यांचे निवेदन घेतले त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर माझे शर्टचे आतील असले बनियानचे आत मध्ये पिनचे सहाय्याने लावुन मला व पंच नं.1 असे आम्ही दोघे माझ्या होंडा अँक्टीव्हा क्रमांक एम एच 11 डी ई 6209 वरुन विमानतळ फलटण येथुन लोकसेवक कोतवाल उदंडे यांची तलाठी कार्यालय फलटण येथे भेट घेणेकामी 13.14 वा.चे सुमारास रवाना केले

तदनंतर तलाठी कार्यालय फलटण येथे पोहचल्यानंतर मी कोतवाल उदंडे यांची समक्ष भेट घेतली तेव्हा कोतवाल

उदंडे यांनी माझ्या कामाबाबत माझ्याशी चर्चा करुन मला "सातबारा वगैरे काढुन ठेवतो, चार वाजता येवुन घेवुन जावा" असे म्हणाले. त्यामुळे मी त्यांचेशी कामाबाबत चर्चा करत असताना त्यांनी मला " मंजुर पण करुन घेतलीय, तुमाला सातबारा आन फेरफार चार वाजता देतो " असे सांगितले त्यावेळी मी त्यांना " चार वाजता का , मग सायबाची, तलाटी सायबाला भेटायला लागल का काय पुन्हा" असे विचारले असता त्यांनी मला "नाय काय गरज नाय असे सांगितले त्यानंतर मी त्यांचेशी कामाबाबत चर्चा करुन पंच नंबर 1 यांचेसह 13.35 वा चे सुमारास सापळा पथक थांबले ठिकाणी परत आलो.

कोतवाल उदंडे यांनी मला चार वाजता भेटायला येण्यास सांगितलेने पो.नि. भोसले यांनी पुन्हा पडताळणी कारवाईचे नियोजन करुन व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन पंच नं.1 डंगारे यांच्यासह मला माझ्याकडील दुचाकी वरून 16.12 वा चे सुमारास फलटण विमानतळ येथुन तलाठी कार्यालय फलटण येथे जाणेसाठी रवाना केले. मी व पंच नंबर 1 असे तलाठी कार्यालय फलटण येथे गेलेनंतर समक्ष कोतवाल उदंडे यांची भेट घेतली. त्यावेळी मी त्यांचेशी कामाबाबत समक्ष चर्चा केली त्यावेळी त्यांनी मला माझे नोंदीचे फेरफार दिले. त्यावेळी मी त्यांना "ह्याची काय फीज ह्याची घ्याची" असे विचारले असता त्यांनी मला "तीस रुपये" असे सांगीतले त्यावेळी मी त्याना तीस रुपये देवुन त्यांचेशी चर्चा करुन बाहेर आलो त्यावेळी कोतवाल उदंडे यानी मला पुन्हा खुणावून माघारी बोलावले. त्यावेळी मी पंच नंबर 1 यांचेसह पुन्हा तलाठी कार्यालयात गेलो. तेव्हा कोतवाल उदंडे मला "नोंदीच देतो म्हणला होता" असे म्हणाले त्यावेळी मी त्यांना "मजी हे फिज व्यतीरीक्त..... मजी किती द्यायचे, सांगा की मला काय?" असे म्हणालो असता ते मला "तुमच्या ह्यान द्या की" असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना "काय तुमी बोललेच नाय काय" असे म्हणालो असता त्यांनी माझ्याकडे पाहुन एक बोट दाखवुन माझ्याकडे एक हजार रुपये लाचेची मागणी केली. तेव्हा मी त्यांना "एक हजार?" असे म्हणालो असता ते मला पाचशे असे म्हणुन माझ्याकडे पाचशे रुपये लाचेची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना "मी काय आणले नायत, येऊ का घेऊन?, आलो घेऊन, आलोच आर्ध्या घंट्यात आलो" असे म्हणुन पंच नंबर 1 यांचेसोबत सापळा पथक थांबले ठिकाणी 16.30 वा चे सुमारास परत आलो.

त्यांनतर पो.नि. भोसले यांनी सापळा कारवाईचे नियोजन करून मला, पंचाना व सापळा पथकास योग्य त्या सुचना दिल्या. पोनि भोसले यांनी सांगितले प्रमाणे मी 500/-रुपये लाचेची रक्कम पंचासमक्ष हजर केली. पोनि भोसले यांचे सहकाऱ्यांनी मी हजर केलेल्या लाचेच्या रक्कमेच्या नोटेचा नंबर एका कागदावर लिहून घेतला. पो.नि. भोसले यांनी अंथ्रासिन पावडरचे गुणधर्म मला व पंचाना समजावून सांगून सापळापुर्व व सापळा कारवाईची माहिती सांगितली. त्यानुसार पो.नि. भोसले व त्यांच्या सहकाऱ्यांनी पंचासमक्ष सापळापुर्व पंचनाम्याची कारवाई पुर्ण केली व सापळा पथकातील अंमलदार यांनी माझ्याकडील लाच रक्कमेस वरील व खालील बाजुस अंथ्रासिन पावडर लावली व ती अंथ्रासिन पावडर लावलेली लाचेची रक्कम माझ्या शर्टच्या वरील डाव्या बाजुच्या खिशात ठेवली व कोतवाल उदंडे यांना लाचेची रक्कम दिल्यानंतर सापळा पथकास दिसेल अशा रितीने डाव्या हाताने डोक्यावरून दोनदा हात फिरवून इशारा करण्याच्या सुचना पो.नि.भोसले यांनी मला दिल्या.

त्यानंतर पो.नि.भोसले यांनी माझ्या शर्टचे आतील असले बनियनला व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन जोडुन मला व पंच नं.1 डंगारे यांना तलाठी कार्यालय फलटण येथे 16.56 वा. सुमारास रवाना केले. तेव्हा मी कोतवाल उदंडे यांची पंच नंबर 1 यांचेसह भेट घेतली व त्यांना "उशीर झाला का?" असे विचारले असता त्यांनी मला "नाय निघालोच होतो" असे म्हणुन माझ्याकडे पाहुन उजव्या हाताचा अंगठा तर्जणीवर घासून लाच रक्कम देणेबाबतचा इशारा केला तेव्हा मी त्यांना "व्हय, तुमी म्हणल्याले आणलय." असे म्हणुन माझ्याकडील पाचशे रुपये लाच रक्कम त्यांचे उजवे हातात दिली तेव्हा त्यांनी लाच रक्कम माझ्याकडुन घेवुन त्याचे शर्टचे वरील डाव्या बाजुच्या खिशात ठेवुन दिली. तेव्हा मी "येवु का" असे म्हणुन कार्यालयाचे बाहेर येवुन लाच रक्कम स्विकारलेबाबत सापळा पथकास दिसेल असा पुर्वनियोजित इशारा केला असता पोनि भोसले व त्यांचे सहका-यांनी येवून कोतवाल उदंडे यांना लाचेच्या रक्कमेसह 17.09 वा.चे सुमारास ताब्यात घेतले. तसेच माझ्याकडील व्हॉईस रेकॉर्डर बंद करुन पो.नि.भोसले यांनी त्यांचे ताब्यात घेतला. त्यानंतर पो.नि.भोसले यांनी सापळा पंचनाम्याची पुढील कारवाई शासकीय विश्रामगृह फलटण येथे करण्याचे निश्चित केले.

तरी दिनांक 06/01/2025 रोजी दिपक दौलतराव उदंडे वय 49 वर्षे, व्यवसाय - कोतवाल (महसुल सेवक) सजा फलटण, ता.फलटण जि.सातारा रा. 123, कसबा पेठ, फलटण, ता.फलटण जि.सातारा यांनी माझ्या पत्नीच्या नावे मलठण येथे खरेदी केलेल्या जागा व घराची नोंद मीच करुन घेतली आहे असे सांगुन केलेल्या कामाचा मोबदला म्हणुन एक हजार रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती 500/- रुपये लाचेची मागणी केली व लाच रक्कम दिनांक 06/01/2025 रोजी तलाठी कार्यालय फलटण येथे 17.09 वा चे सुमारास स्विकारली म्हणुन माझी त्यांचे विरुद्ध कायदेशीर तक्रार आहे.

माझा वरील खबरी जबाब माझे सांगणेप्रमाणे मराठीमध्ये टंकलिखीत करण्यात आला असून तो बरोबर असल्याची

खात्री करून मी त्यावर सही केली आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

HEMANT KUMAR SHAH(I (Inspector)) / PBMH74883 **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

HSPawar
PN 734

**Signature of Officer in charge, Police Station**
पोलीस ठाणे अंमलदार
पोलीस स्टेशन
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): HEMANT KUMAR SH.
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PBMH74883

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): Physical features, deformities and other details of the ( If known / seen )(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**